Multi-Disciplinary Journal
ISSN No- 2581-9879 (Online), 0076-2571 (Print)
www.mahratta.org, editor@mahratta.org

# सप्तमी विभक्तीच्या अध्यापनाचे नवीन परिप्रेक्ष्य

**धनश्री शेजवलकर**
**सहायक प्राध्यापक आणि संशोधक छात्र**

संस्कृत भाषा व व्याकरण यांचा घनिष्ठ संबंध आहे.

किंवा -

यांसारख्या पारंपरिक श्लोकांमध्ये व्याकरणाच्या अध्ययनाचे संस्कृतभाषेतील अढळ स्थान अधोरेखित केलेले दिसते. असे असले तरीही गेल्या काही वर्षांमध्ये संस्कृतभाषेच्या व्याकरणाचे शालेय व महाविद्यालयीन स्तरांवरील प्राथमिक अध्ययन व अध्यापन हे पाणिनीय व्याकरणापासून खूपच दूर गेलेले दिसते. शास्त्रीय संस्कृत ग्रंथ वाचणाऱ्यांनीही संस्कृत व्याकरणाचा चांगला अभ्यास करणे आवश्यक असते. ते पारंपरिक पद्धतींच्या पाठशाळांमध्ये व्याकरणाच्या प्रकरणग्रंथांचे अध्ययन करतातही, पण त्याच्या प्रत्यक्ष उपायोजनात मात्र मागे पडतात. शालेय व महाविद्यालयीन स्तरावर व्याकरणाच्या केवळ सुलभतेला आणि सुबोधतेलाच महत्त्व दिले जात असल्याने एकंदरीतच व्याकरणाची अध्ययन- अध्यापनाची पातळी गेल्या दोन दशकांमध्ये खालावली आहे.

प्रस्तुत निबंधामध्ये संस्कृतव्याकरणातील मूलभूत संकल्पना विभक्ती - हिचा नवीन विचार केला आहे. संस्कृत व्याकरणात विभक्तींचा अभ्यास खूपच महत्त्वाचा आहे. प्राथमिक स्तरापासूनच विभक्तींचे विविधरूपातील उपयोग समजावून सांगितल्यास व्याकरणाबद्दलची भीती दूर होते. तीनही टप्प्यांवर विभक्तीचा एकच विचार एकसूत्राने शिकवल्यास व्याकरणविषयक समज दृढ होण्यास मदत होऊ शकते.

निबंधलेखिकेला प्राथमिक स्तरावर संस्कृत व्याकरण शिकवण्याचा दोन दशकांचा अनुभव आहे. त्या त्या अनुभवाच्या आधारे विभक्तींच्या अध्यापनाची एक सर्वसमावेशक पद्धती राबवण्यात येईल या विचाराने हा निबंध लिहिला आहे.

- आधीच्या व्याकरणपुस्तकातील विभक्तींचे अध्यापन

संस्कृत व्याकरणाची विविध पुस्तके पाहिली असता पुढील मुद्दे लक्षात आले-

१) सन १९२० मध्ये प्रथम प्रकाशत झालेल्या संस्कृतप्रवेशः या राजाराम दामोदर देसाई लिखित पुस्तकात विविध वाचनपाठांच्या द्वारा भाषान्तराचा भरपूर सराव करून घेतलेला असला तरीही वाक्याविचारातच विभक्त्यांचे अर्थ त्यात शिकवलेले आहेत.

२) सन १९५१ मध्ये प्रकाशित व्यावहारिक संस्कृत व्याकरण या रामचंद्र गणेश बोरवणकर लिखित पुस्तकात पाणिनीय सूत्रांच्या उल्लेखाने बरेच विवरण केलेले आहे. परंतु एक विभक्ती घेऊन तिचा विविधरूपी वापर दर्शवलेला नाही.

३) सन १९७२ मध्ये बाविसावे संस्करण झालेल्या अनुवादचंद्रिका या जगदीशलाल शास्त्री यांनी संस्कृत केलेल्या पुस्तकात सुरुवातीलाच विभक्तींचे अर्थ स्पष्ट करून सांगताना कारकार्थविचार केला आहे.

सप्तमी विभक्ती प्रमाणे सर्वच विभक्तींचे सर्वसमावेशक प्रारूप तयार करणे शक्य आहे. यामध्ये विभक्तींचा विचार तीन स्तरांवर करायचा आहे.

१. वर्णकार्य (प्रकृति-प्रत्यय)
२. पदकार्य (अजन्त व हलन्त प्रातिपदिके)
३. वाक्यकार्य (उपयोजित)

या निबंधामध्ये सप्तमी विभक्तीच्या अध्यापनाच्या अशा सर्वसमावेशक प्रारूपाचा विचार आहे.

सप्तमी विभक्ती निवडण्यामागची कारणे-

क्रियेचे अधिकरण म्हणून स्थल व काल या घटकांचा मुख्यत्वेकरून विचार सप्तमी विभक्तीच्या कारकार्थात केला आहे. पाणिनीने अष्टाध्यायीत सूत्र क्रमांक १|४|४५ मध्ये आधारोऽधिकरणम् व २|३|३६ तिला असणारा काल हा अर्थ मात्र पुढे पाचव्या अध्यायात तद्धित प्रत्यय सांगताना स्पष्ट केला आहे. सप्तमी विभक्तीच्या सर्वसमावेशक नवीन प्रारूपात पुढील दहा पायऱ्यांनी विचार करता येतो. या क्रमाने अध्यापन केल्यास सप्तमीच्या अधिकरण या कारकार्थाबरोबरच काल हा अर्थही स्पष्ट होण्यास मदत होते.

१. सप्तमी विभक्तीचे सुप् प्रत्यय - त्रिक संकल्पना
२. अजन्त व हलन्त प्रातिपदिकांची सप्तमीची रूपे
३. सप्तमीचा कारकार्थ - अधिकरण - त्रिप्रकारक आधार
४. तद्धित प्रत्ययांनी साधलेले सप्तमीच्या अर्थाचे प्रयोग
५. सप्तमी विभक्तीचा काल या घटकाशी असणारा घनिष्ठ संबंध
६. विशिष्ट पदांच्या बरोबर वापरली जाणारी सप्तमी विभक्ती
७. सप्तमी तत्पुरुष समास
८. बहुव्रीही समासातील सप्तमी
९. भावलक्षण सप्तमी (सति सप्तमी)
१०.कर्मप्रवचनीय सप्तमी

Mahratta
Multi-Disciplinary Journal
ISSN No- 2581-9879 (Online), 0076-2571 (Print)
www.mahratta.org, editor@mahratta.org

१) सुप् प्रत्ययातील सप्तमी विभक्ती समजावताना त्रिक संकल्पना समजवावी. अष्टाध्यायीतील या सूत्राने स्वौजसमौट विभक्तींचे २१ प्रत्यय सांगितले आणि त्यानंतरच्या दोन अध्यायांत तद्धित तद्धित प्रत्यय सांगितले आहेत. सुप् प्रत्ययांचे तीन-तीनचे भाग म्हणजेच विभक्तीकरून पहिल्या भागाला प्रथमा, दुसऱ्याला द्वितीया या क्रमाने सप्तमीपर्यंतच्या प्रत्ययांचे एकवचन-द्विवचन-बहुवचन असे गट केलेले आहेत. यातील ङि - ओस् .-सुप् हे त्रिक म्हणजे शेवटचे त्रिक. हे

२) पुढची पायरी म्हणजे ह्या त्रिकातील प्रत्यय प्रातिपदिकांच्या पुढे लावताना अन्तानुसार होणारे बदल शिकवावेत.

| प्रातिपदिक | सप्तमी एकवचन | बदल |
|---|---|---|
| अकारान्त, आकारान्त,<br><br>ईकारान्त, उकारान्त,<br><br>ऊकारान्त | ङि | |
| तकारान्त, सकारान्त, ककारान्त, चकारान्त | ङि | |
| | ओस् | ओः (हलन्त) योः (अजन्त) |
| | सुप् | षु/झु<br>अदन्त प्रातिपदिकाच्या आधीच्या एकाराचे अध्यापन बहुवचने झल्येत् ७.३.१०३ |

३) अष्टाध्यायीत पहिल्या अध्यायातील चौथ्या पादामध्ये विभक्तींना अर्थ प्राप्त करून देणारे येतात. सप्तमीचे प्रत्यय लागून पदे तयार केल्यावर त्यांचे वाक्यातील अर्थ समजावताना अधिकरण हा कारकार्थ संज्ञारूपाने समजावून सांगावा. अधिकरणाचा मुख्य अर्थ आधार हा सांगितला असला तरी आधाराचे तीन प्रकार सोदाहरण सांगावेत-

४) पुढच्या पायरीवर अधिकरण या कारकार्थाबरोबर सप्तमीच्या अर्थाने अभिप्रेत असणारे तद्धित प्रत्यय शिकवावेत. पाणिनीय सूत्र ५|३|१ मध्ये 'प्रग्दिशो विभक्तिः' याच्या अधिकारात विभक्ती शब्द यांच्यापासून करायचे आहेत.

या अधिकारात सप्तम्यास्त्रल् ५ |३|१० हे सूत्र सप्तम्यन्त किम् इत्यादींपासून त्रल् प्रत्ययाचे करते. त्यावरून सप्तमीचा अर्थ अधिकरणाबरोबरच स्थलवाचकही होतो हे जिज्ञासूंच्या लक्षात येऊ लागेल.

७|२|१०५ या सूत्रांनी विकल्पाने क्व या रूपाचीही सिद्धी केली आहे. अत्र या रूपाच्या सिद्धीतही सप्तमी सप्तमीचा स्थलवाचक हा अर्थ लपलेला आहे.

पुढच्या सेर्वेकान्यकिंयत्तदः काले दा ५ |३|१५ या सूत्राने कालवाचक सप्तमी हा अधिकरणाने न उलगडलेला अर्थ स्पष्ट होतो.

उलगडून सांगावा.

५) इथपर्यंतच्या स्तरावर सप्तमीचा कारकार्थाची व्याप्ती अधिकरण स्थल, काल अशी वाढेल.
६) यापुढील स्तरावरचा अभ्यास विशिष्ट पदांच्या बरोबर जोडल्या जाणाऱ्या सप्तमीचा असावा.

७) यापुढे सप्तमी तत्पुरुष समासातील सप्तमीचा विशेष अर्थ शिकवावा.
शब्दांबरोबर सप्तम्यन्ताचा समास शिकवावा.

८) यापुढे बहुव्रीही समासातील वैशिष्ट्यपूर्ण सप्तमी शिकवावी. २|२|३५ सप्तमी विशेषणे बहुव्रीहौ या सूत्राने कळणारा कण्ठेकालः यासारखा व्यधिकरणपद बहुव्रीही समास अलुक् राहतो हे सांगावे.
९) यापुढील पायरीवर कर्मप्रवचनीय म्हणून सप्तमीचा वापर तुरळकपणे केला जातो हे शिकवावे. कर्मप्रवचनीय ही संकल्पना समजावणे जरी क्लिष्ट असले तरीही प्रादिगणातील विशिष्ट निपातांबरोबर सप्तमीचा वापर होतो असे सांगता येईल.
यस्मादधिकं यस्य चेश्वरवचनं तत्र सप्तमी - २|३|९ या सूत्राचा आधार घेऊन स्वस्वामिभाव संबंधातील दोन्ही संबंधांची सप्तमी होऊ शकते हे समजवावे.

१०) शेवटच्या पायरीवर सप्तमीचा वाक्यरचनेतील विशेष अर्थ जो भावलक्षण सप्तमी अथवा सति सप्तमी म्हणून केला जातो तो शिकवावा. सूत्र २ |३|३७ - यस्य च भावेन भावलक्षणम् याचा आधार घेऊन अध्यापन केल्यास कालवाचक सप्तमीचा अर्थ अधिक स्पष्ट होईल.

अशा प्रकारे या दहा पायऱ्यांनी सप्तमी विभक्तीचे वर्णकार्य ते वाक्यरचना यातील स्वरूप सोदाहरण समजावून सांगावे.

या प्रस्तावित प्रारूपाच्या अध्यापनासाठी संस्कृत भाषेची प्राथमिक पातळीवरील ओळख असणे अपेक्षित आहे. अगदी नव्याने संस्कृत भाषा शिकू इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी या प्रारूपातील काही पायऱ्या शिकवता येतील. उरलेल्या पायऱ्या मात्र प्रगत स्तरावर शिकवाव्या लागतील.

**प्रस्तुत निबंधामध्ये मांडलेले सर्वसमावेशक प्रारूप हे महाविद्यालयीन व उच्चमहाविद्यालयीन राबवून त्याची उपयुक्तता पडताळता येईल. या प्रारूपाद्वारे पाणिनीय व्याकरण व सुलभ संस्कृत व्याकरण यांचा मेळ घालून संस्कृतभाषेच्या व्याकरणाला पुन्हा एकदा अभ्यासक्रमात महत्त्व प्राप्त होईल.**

---

**संदर्भ ग्रंथ**

**१. देसाई, राजाराम दामोदर. १९२०. *संस्कृतप्रवेशः* पुणे: कॉटीनेंटल प्रकाशन.**

**४. साठे, महादेव दामोदर. १९६५. *वैयाकरणसिद्धान्तकौमुदी भाग पहिला* पुणे: वि.ना. दीक्षित.**